# प्रेस नोट

## ११ वर्षे फरारी असलेल्या आरोपीत यास स्थानिक गुन्हे शाखेकडून शिताफिने अटक.

दि. ०१.०५.२०१८.

---

वैभववाडी पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर २२/२००७ भा दं वि कलम ३८० या गुन्हयातील आरोपी राजु राठोड याने कोकीसरे नारकरवाडी, ता. वैभववाडी येथील उघडया घरीतील पत्र्याचे पेटीत ठेवलेली १८,०००/- रुपये रोख रक्कम चोरुन नेलेले होती. गुन्हा घडलेपासुन म्हणजेच दि.१४.०५.२००७ रोजी पासुन सदरचा आरोपी हा नजरेआड होता. आरोपीत हा मिळून येत नसल्याने मा. न्याय दंडाधिकारी वर्ग-१, कणकवली यांनी सदर आरोपीत यास फरारी घोषित केलेले होते. सिंधुदुर्ग जिल्हयातील फरारी व पाहीजे आरोपीचे अटकेबाबत मा. पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग श्री दिक्षीत गेडाम यांनी विशेष मोहीम राबविली होती. सदर फरारी आरोपीत यास अटक करण्याकरीता मा. पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग श्री दिक्षीत गेडाम व मा. अपर पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग श्री प्रकाश गायकवाड यांनी पोलीस निरीक्षक श्री प्रल्हाद पाटील, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सिंधुदुर्ग यांचे नेतृत्वाखाली विशेष पोलीस पथक स्थापन केलेले होते. सदर विशेष पोलीस पथकाने फरारी आरोपी याचे अटकेबाबत गोपनीय बातमीदारांमार्फत शोध घेण्याचा प्रयत्न सातत्याने सुरु ठेवला होता.

दि. ३०.०४.२०१८ रोजी फरारी आरोपी राजु सोमु राठोड वय ३९ वर्षे रा. विजापुर कर्नाटक हा कागल, कोल्हापुर येथे आपला भाऊ याचेकडे येणार असल्याचे माहीती गोपनीय बातमीदारांमार्फत पोलीस पथकास मिळाली त्यावरुन पोलीस निरीक्षक प्रल्हाद पाटील यांचे मार्गदर्शप्रमाणे पोहेकॉ/५७७ आशिष गंगावणे, पोना/संतोष सावंत, पोकॉ/सत्या पाटील, पोकॉ/ संकेत खाडये, पोकॉ/ रवि इंगळे यांनी कागल, कोल्हापुर येथे जावुन मिळालेल्या बातमीच्या अनुशंगाने सापळा रचुन फरारी आरोपी राजु सोमु राठोड वय ३९ वर्षे रा. विजापुर कर्नाटक यास शिताफिने अटक करुन ताब्यात घेवुन वैभववाडी पोलीस ठाण्यात पुढील कार्यवाहीकरीता हजर करण्यात आलेले आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग श्री दिक्षीत गेडाम, मा. अपर पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग श्री प्रकाश गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सिंधुदुर्ग श्री प्रल्हाद पाटील, पोहेकॉ/५७७ आशिष गंगावणे, पोना/संतोष सावंत, पोकॉ/सत्या पाटील, पोकॉ/ संकेत खाडये, पोकॉ/ रवि इंगळे यांनी केलेली आहे.

---

पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग